# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 45) 15th June 2020 ( No. of Pages 20 ) ( No : 04


## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHER'S ORGANISATION

University Club House, B-Road, Churchgate, Mumbai 400 020


*PRESIDENT*
**Prof. Dr. Tapati Mukhopadhyay**
Park Side 3, Wing, Flat No. 1308
Kulupwadi Road, Borivali (East)
Mumbai 400 066
Ph. 02228871430/+919820319455
Email: mukhopadhyay_tapati@rediffmail.com

*GENERAL SECRETARY*
**Prof. Dr. S.P. Lawande**
SARANG, Balajinagar
Mandavgan Road, Shrigonds,
Dist Ahmednagar 413 701
Ph: 09422228174
Email: splawande@gmail.com


**30 March 2020**

To
**Shri Uddhav Thackeray,**
Honourable Chief Minister,
Maharashtra State,
Mantralaya, Mumbai 400 032

**Sub:** Decision of Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations (MFUCTO) to contribute one day's salary of its members to the Chief Minster's Relief Fund to help fight COVID-19

Respected Sir,

**1.** World over people have been facing a critical time due to the pandemic created by the daily spread of COVID-19. Active Coronavirus cases in the world increased to 7.22 lakh, with almost 34 thousand deaths on March 29 2020. In the USA, these numbers have reached about 1.42 lakh and almost 2.5 thousand. The numbers have spread at an alarming rate in the Western Europe, Iran and other countries. China, where from the COVID-19 originated, seems to have contained the killer disease.

**2.** In India, the numbers have been moving up on daily basis. On March 29, we have 1,024 total cases of COVID-19, with 27 deaths. In our state Maharashtra, the numbers are 186 and 7. These numbers are likely to increase in the next several weeks, according to experts.

**3.** It is also important to realize that in Mumbai we live in a highly congested city, with almost 20 million people (Greater Mumbai), a density of population as high as 20,482 persons per square km. The spread potential of COVID- 19 is very high in Mumbai. This is a cause for alarm.

**4.** People in the country have been living in house quarantine with a 'Lock Down' of all economic, social and other activities, except certain permitted essential services. Still more than two more weeks of lock down would continue.

**5.** The effect of COVID-19 and the subsequent 'Lock Down' has already created a massive adverse impact on the economy at every level. Recently, Government of India announced an economic package in an attempt to contain the difficult situation. There is increased unemployment. Large numbers of daily workers all over the country have lost their income. Migrant workers in lakhs, losing their small jobs, have been on the move, some on foot to reach home far away.

**6.** The overall adverse impact of COVID-19 in India is extremely difficult. Considering this, many corporates, organizations and conscientious citizens have started contributing their might. Large amount of resources is required for increasing testing facilities and labs, hospital beds, engaging doctors and hospital staff, so on and so forth.

**7.** This is to put on record that we are immensely thankful to all doctors, nurses, all categories of hospital staff and related worker, who have been relentlessly rendering their services for the cure of the Coronavirus affected patients, risking their own life, many of them have been our students at various phases of their studies. We are proud of them

**8.** Under this compelling circumstance, Maharashtra Federation of University and College Teachers' Organizations also decided to contribute one day's salary of its members to the Chief Minster's Relief Fund to help fight COVID-19. Please note that MFUCTO is an organization of degree college and university teachers, with nearly 30,000 members, affiliated to 11 nonagricultural universities of Maharashtra. MFUCTO has decided that each member of MFUCTO would contribute one day's salary to the Chief Minister's relief Fund as a token contribution for fighting this unprecedented pandemic arising out of COVID-19.

**9.** It has been further decided that the one day's salary (as mentioned above) may please be deducted at source by the government from their Salary due to be paid in April 2020 and be deposited to the Chief Minister's Relief Fund. With Regards,

Yours sincerely,

**Dr. Tapati Mukhopadhyay** (President) **Dr. S.P Lawande** (General Secretary)

Copy to Shri Uday Samant, Honourable Minister of Higher and Technical Education, Government of Maharashtra ,with a request for appropriate action with respect to paragraphs 8 and 9

***** ***** *****

**From:** madhu paranjape [msparanjape@gmail.com]
**Sent:** Monday, March 30, 2020 11:57 AM
**To:** Shri. Uddhav Balasaheb Thackeray (Chief Minister)
**Cc:** ministerudaysamant@gmail.com
**Subject:** MFUCTO - Regarding Contribution of One Day's Salary By College and University Teachers
Respected Sir,
Kindly find attached letter from Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations
On behalf of
Dr. Tapati Mukhopadhyay President, MFUCTO

***** ***** *****

**From:** Shri. Uddhav Balasaheb Thackeray (Chief Minister) <CM@maharashtra.gov.in>
**Date:** Mon, 30 Mar, 2020, 12:06
**Subject:** FW: MFUCTO - Regarding Contribution of One Day's Salary By College and University Teachers
**To:** Saurabh Vijay <psec. higheredu @ maharashtra.gov.in>
**Cc:** msparanjape@gmail.com<msparanjape @ gmail.com>

माननिय श्री/श्रीमती

धन्यवाद,

आपला "ईमेल" मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाला असून तो पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत विभागास पाठविण्यात आला आहे.

नोंदणी शाखा, मुख्यमंत्री कार्यालय.

***** ***** *****

# घरात राहा, घरातच राहून संपर्कात राहा, संपर्कात राहून आपण काय मदत करू शकतो, ते पहा

## या अभुतपूर्व संकटाच्या प्रसंगी आपणही आपला खारीचा वाटा उचलू या

**डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा' : दिनांक : ३० मार्च २०२०**

**१.** कोरोना विषाणूच्या प्रार्दूभावामुळे संपूर्ण जग एका महायुद्धाला सामोरे जात असल्यासारखी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले, तेव्हा जगामध्ये या विषाणूपासून बाधित झालेल्या लोकांची संख्या ही ७.२२ लाख होती ती पुढच्या २४ तासामध्ये ७,२७,०८० झाली. जगभरात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींची संख्या ३४ हजार होती ती पुढच्या २४ तासात ३४८१० झाली. अमेरिके सारख्या प्रगतिशील देशामध्ये कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या १.४२ लाख असून मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ही २.५ हजार इतकी आहे.

**२.** देशाच्या स्तरावर मा. पंतप्रधानांच्या नेतृत्त्वाखाली केंद्रशासन व राज्यस्तरावर मा.मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली राज्यशासन या महाभयंकर विषाणूशी संघर्ष करीत असतांना समाजातील सर्वच वर्गांनी या संघर्षामध्ये मनापासून साथ दिली पाहिजे व ती तशी दिली जात आहे. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने या मुकाबल्यासाठीच्या केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या आदेशांचे पालन झाले पाहिजे. दैनंदिन मजुरीवर काम करणाऱ्या शेकडो कामगारांवर अत्यंत दुर्दैवी असे संकट कोसळलेले आहे. बेरोजगार असलेले तरुणसुद्धा या संकटाशी सामना करीत आहेत. एका बाजूला त्यांना दैन्यावस्थेपासून वाचविण्याचा शासन प्रयत्न करीत असतांना दुसऱ्या बाजूला दवाखाने, इस्पितळे, लेबॉरटरीज यातून काम करणारा डॉक्टर वर्ग व कर्मचारी वर्ग अतिशय शर्तीने या संकटाचा सामना करीत आहेत. आवश्यक सेवा चालू ठेवणारा मोठा वर्ग जीव संकटात घालून काम करीत आहे. संकटाचा हा सामना करीत असतांना फार मोठे आर्थिक पाठबळ या कामी लागण्याची शक्यता आहे. समाजातील निरनिराळ्या वर्गांनी या कामासाठी पुढाकार घेतलेला आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी सुद्धा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली आपला खारीचा वाटा उचलण्याचा निर्धार केलेला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी पदाधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा करून एक अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे व तो निर्णय असा आहे की, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक आपले एक दिवसाचे वेतन या कामासाठी शासनाकडे सुपूर्द करतील. गेले २-४ दिवस पदाधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा करून घेतलेला हा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक ३० मार्च २०२० रोजीच्या पत्रान्वये ई-मेलद्वारे कळविला आहे. हे पत्र **सहपत्र : एक** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे. *(पृष्ठ ४१ पहा)*

**३.** लहानसा का होईना पण एकरकमी असा निधी या संघर्षामध्ये शासनाकडे उपलब्ध व्हावा म्हणून एक दिवसाचे वेतन उद्‌गमी कपात करून शासनाकडे ते जमा केले जावे अशी विनंती महासंघाने या पत्रान्वये केलेली आहे. संघटनेने अशा प्रकारची विनंती करणे हा एक विशेष निर्णय असून एका असामान्य संकटाला तोंड देतांना हा निर्णय घेण्यात आलेला आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात येत आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतच्या संघटनात्मक प्रवासामध्ये यापूर्वी असा निर्णय फक्त एकदाच घेण्यात आलेला होता. दिनांक ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या भीषण भूकंपामुळे मराठवाड्यात जवळ जवळ ३० हजार लोक मृत्युमुखी पडले होते व फार मोठी वित्तहानी झाली होती. त्यावेळी महासंघाने असाच निर्णय घेतला होता. महासंघाचे तत्कालीन सरकार्यवाह प्रा.के.के.ठेकेदत्त यांनी शासनाला दिनांक ०२.१०.१९९३ रोजी लिहिलेले पत्र मी **सहपत्र : दोन** म्हणून सोबत प्रसृत केले आहे. त्यावेळी महासंघाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी दिनांक ०४.१०.१९९३ रोजी प्रसृत केलेले एक निवेदन **सहपत्र : तीन** म्हणून प्रसृत केले आहे. नुटा बुलेटीनने त्यावेळी भूकंप स्थितीवर विशेषांक (सन १९९३ चा सहावा अंक) काढला होता. त्यावेळी संपादकांनी लिहिलेले लहानसे संपादकीय **सहपत्र : चार** म्हणून प्रसृत केले आहे.

**४.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या परंपरेला शोभेसा निर्णय महासंघाच्या पातळीवर घेण्यात आला असून मा. मुख्यमंत्र्यांना या संबंधीचे निवेदन अध्यक्ष व सचिवांनी दिनांक ३० मार्च २०२० रोजी सादर केलेले आहे, त्यावर त्याच दिवशी मा. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून ताबडतोब कार्यवाही करण्यात आलेली असून "आपला 'ईमेल' मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाला असून तो पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत विभागास पाठविण्यात आला आहे." असे मा. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने संघटनेला ईमेलद्वारे कळविलेले आहे. याबाबत पुढच्या २-४ दिवसात काय कार्यवाही केली जाते ते पाहून त्यानंतर महासंघाच्या पातळीवर याबाबतीत योग्य ती पावले उचलली जातील.

**५.** गेल्या दोन-चार दिवसात काही सेवानिवृत्त ज्येष्ठ प्राध्यापकांनी माझ्याशी संपर्क केला. याबाबतीत आपण काही ठरविले आहे काय? याची विचारणा केली. सेवेत असलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा याबाबतीत एका दिवसाच्या वेतनाचा सहभाग ही गोष्ट एकाच खात्याच्या अंतर्गत येत असल्यामुळे उद्‌गम कपात शक्य होऊ शकेल असे वाटते. सेवानिवृत्त शिक्षकांच्या बाबतीत 'उद्‌गमी कपात' ही गोष्ट कठीण होईल असे दिसते. कारण हा सर्व व्यवहार ट्रेझरी मार्फत होतो व तेथेही वेगवेगळ्या विभागाच्या लाखात संख्या असलेल्या सेवानिवृत्तांमध्ये प्राध्यापकांची महाराष्ट्रातील संख्या काही हजारात आहे. आपणही या कामी काही मदत केली पाहिजे ही भावना या प्राध्यापकांमध्ये सुद्धा तीव्रतेने दिसून आली. योग्य वेळेला केली जाणारी लहानशी मदत सुद्धा अतिशय महत्त्वाची आहे. या भावनेने नुटाच्या पातळीवर काही निर्णय घेता

## *लॉकडाऊन बुलेटीन* : : Lockdown Bulletin

**१.** सन २०२० चे तिसरे बुलेटीन (पृष्ठ ३३-४०) हे तयार होऊन मुद्रणासाठी गेले. तसेच दिनांक २० मार्च २०२० रोजी नुटाच्या संकेतस्थळावर ते 'अपलोड' करण्यात आले. मुद्रण होऊन आल्यानंतर १ एप्रिल २०२० रोजी ते पोस्टाद्वारे रवाना करण्याचे नियोजन होते. मात्र लॉकडाऊन सुरू झाल्यामुळे व सर्व कार्यालये (पोस्टासह) बंद असल्यामुळे ते बुलेटीन रवाना होऊ शकले नाही. आता अंशतः लॉकडाऊन अनलॉक झाल्यानंतर **पोस्टाची परवानगी घेऊन दिनांक ९ जून २०२० रोजी सन २०२० चे तिसरे बुलेटीन पोस्टामार्फत रवाना करण्यात आलेले आहे.**

**२.** मार्च २०२० च्या शेवटच्या आठवड्यात व एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात लॉकडाऊन आणखी किती दिवस चालेल याचा अंदाज करणे कोणालाही शक्य नव्हते. त्यामुळेच संपर्क माध्यम म्हणून बुलेटीन सुद्धा रवाना करता येणार नाही हे निश्चित झालेले होते. अशा परिस्थितीत संपर्क माध्यम म्हणून १२ परिच्छेद असलेले अध्यक्षांचे एक निवेदन आवश्यक त्या सहपत्रांसह नुटाच्या संकेतस्थळावर 'अपलोड' करण्याचा निर्णय घेण्यात आला. या तऱ्हेने आवश्यकतेनुसार एकामागून एक परिच्छेद प्रसृत करण्यात आले. (१) १ ते १२ परिच्छेद ३१ मार्च २०२० रोजी (२) १३ ते १५ परिच्छेद २ एप्रिल २०२० रोजी (३) १६ ते ३२ परिच्छेद २४ एप्रिल २०२० रोजी (४) ३३ ते ४१ परिच्छेद ३ मे २०२० रोजी (५) ४२ ते ५० परिच्छेद ८ मे २०२० रोजी व शेवटी (६) ५१ ते ५६ परिच्छेद १९ मे २०२० रोजी प्रसृत करण्यात आले. **आज आता हे सर्व परिच्छेद एकत्रित करून सन २०२० च्या चौथ्या बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात येत आहेत. निरनिराळ्या परिच्छेदांमध्ये उल्लेख करण्यात आलेली सहपत्रे सुद्धा यासोबतच प्रसृत करण्यात येत आहेत.** प्रत्येक सहपत्राच्या शिर्षभागी त्या सहपत्राशी संबंधित परिच्छेदाचा उल्लेख नमूद केलेला आहे.

**३. त्या अर्थाने विचार करून जाता सन २०२० चे चौथे बुलेटीन म्हणजे लॉकडाऊन बुलेटीन (Lockdown Bulletin) आहे, असे म्हणता येईल.** या बुलेटीनमध्ये (१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सचिव व अध्यक्ष यांनी दिनांक ३० मार्च २०२० रोजी राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना लिहिलेले पत्र (२) संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी प्रसृत केलेले परिच्छेद १ ते ५६ (३) परिच्छेद १ ते ५६ मध्ये उल्लेख केलेली सहपत्रे या अंकात प्रसृत करण्यात आलेली आहेत. - **संपादक, नुटा बुलेटीन**

येईल काय? याचा विचार करण्यात आला. नुटाच्या पदाधिकाऱ्यांशी व संघटनेचे ज्येष्ठ नेते प्रा.बी.टी.देशमुख यांच्याशी चर्चा करून आता असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, प्रत्येक सेवानिवृत्त शिक्षकाने आपल्या एक दिवसाच्या निवृत्तीवेतना इतकी रक्कम "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९" मध्ये जमा करावी. याबाबतची पद्धतीसुद्धा ठरविण्यात आलेली आहे.

६. घरातच राहा, घरातच राहून एकमेकांच्या संपर्कात राहा व संपर्कात राहून घरातूनच आपल्याला अल्पशी मदत करता येईल अशा पद्धतीची निवड करण्यात आलेली आहे. ती पद्धती पुढीलप्रमाणे :-

(१) "https://cmrf.maharashtra.gov.in" ही मुख्यमंत्री सहाय्यता निधी जमा करण्याकरिता महाराष्ट्र शासनाची अधिकृत वेबसाईट आहे.

(ii) ही साईट ओपन केल्यानंतर मुख्य पृष्ठावर डाव्या बाजूला सर्वात खाली "ऑनलाईन देणगी" (Donate Online) हा कॅप्शन सिलेक्ट करा. (ही साईट मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध आहे.)

(iii) त्यानंतर येणाऱ्या पृष्ठावर देणगीदार प्रवर्ग (Donar Category) मध्ये व्यक्तिगत (Individual) सिलेक्ट करा आणि निधी (Fund) मध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधी - कोविड १९ (Chief Minister's Relief Fund-COVID 19) सिलेक्ट करा व त्यानंतर दाखल करा (Submit) या बटणवर क्लिक करा.

*(सहपत्र दोन : परिच्छेद ३ पहा)*

**Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations**

(registered under trade Union Act, 1926, No.By-II-8162 of 1985.)

affiliated to All India Federation of University and College Teachers' Organisation.

**Shri K.K.Theckedath,**

General Secretary,

Savant Sadan, A-6/11, Jeevanbima Nagar,

Mandapeshwar, P.O. Boriwali (West) Bombay - 400103

Telephone No. 851013

Ref.No.Don-578/93 Dt/- 2nd October, 1993

**To,**

**The Education Minister,**

Government of Maharashtra,

Mantralaya Annexe, Bombay-400 032.

**Subject :** Donation of one day's wages of college and university teachers of Maharashtra to the Chief Minister's Fund for providing relief to earthquake victims of Marathwada.

Sir,

The MFUCTO expresses its profound sorrow at the death and destruction caused in Marathwada region by an earthquake on 30th September, 1993. The gravity of the loss is unprecedented, both in terms of number of men, women and children who have died and in terms of property destroyed. It is a national calamity in facing which all our citizens should extend help and cooperation.

The MFUCTO is calling upon all its constituents and members which number 25000 teachers from the non-agricultural Universities and affiliated colleges and Junior Colleges to come forward in this task of reconstruction and rehabilitation of victims by contributing one day's wages to the Chief Minister's Fund, Government of Maharashtra.

While the MFUCTO is normally not in favour of collection of donation from the source, since the havoc caused by the earthquake is of an unprecedented nature and the mobilisation of the funds is to be made on war-footing, we request you to arrange to make the collection from the teachers and in case this is not possible at your level to inform us so that the MFUCTO can make its own arrangement for the collection. We should like to make it clear at the same time that this direct collection should not be made a precedence since the MFUCTO is opposed to such a practice.

Thank you,

Yours truly,

(K.K.Theckedath)

General Secretary, MFUCTO

Copy to : The Secretary (Higher Education) Govt. of Maharashtra (P43NB1993)

(iv) त्यानंतर येणाऱ्या पृष्ठावर एक फॉर्म येईल ज्यामध्ये आपल्याला देणगीदाराची थोडीशी माहिती भरावयाची आहे. ही माहिती भरल्यानंतर ऑनलाईन देणगी (Donate Online) या बटणवर क्लिक करा.

(v) त्यानंतर पेमेंट गेटवे पेज येईल. त्यामध्ये निरनिराळ्या पद्धतीने पेमेंट करता येईल. उदा. नेट बँकींग, डेबिट किंवा क्रेडीट कार्ड किंवा इतर अन्य UPI ॲप इत्यादी.

(vi) यशस्वीरित्या पेमेंट झाल्यानंतर Chief Minister's Relief Fund असे पृष्ठ समोर येईल. येथे थोडे थांबा. या पृष्ठावर शेवटचे वाक्य To get Acknowledgemet click here असे दिसेल. क्लिक केल्यावर अधिकृत पोचपावती तुम्हाला उपलब्ध होईल.

ही संपूर्ण प्रक्रिया इंटरनेटवर किंवा मोबाईलवर पार पाडता येते.

७. हे सर्व प्रत्यक्ष करून पाहिल्यानंतर उपलब्ध होणारा पोचपावतीचा नमूना सोबत **सहपत्र : पाच** म्हणून प्रसृत केलेला आहे. त्यातील रकमेचा भाग दिसणार नाही याची काळजी घेतली आहे. ती एवढ्या साठीच की, रक्कम लहान किंवा मोठी हा विषय होवू नये. संघटना म्हणून निर्णय झालेला आहे तो असा की, "प्रत्येक सेवानिवृत्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकाने आपले एक दिवसाचे निवृत्ती वेतन "Chief Minister's Relief Fund-COVID 19" मध्ये जमा करावे. ही रक्कम अगदी रूपये आणे पैशात असू नये. ढोबळमानाने ती खालच्या किंवा वरच्या रुपये १०० च्या टप्प्यावर राऊंड फिगर असावी.

८. उपरोक्त पोचपावती हाती पडताच त्या पावतीमधील पुढील मजकूर संघटनेच्या अध्यक्षांच्या 9834897593 या मोबाईल वर पाठवा:-

"Mr. Bhaurao Deshmukh, Amravati Dated 29.03.2020 GRN 030414201920E : Amount" ही सर्व यादी क्रमशः बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अध्यक्षांकडे मोबाईलवर मेसेज पाठवितांना देणगीदानाचे नाव, शहराचे नाव, (पूर्ण पत्ता नव्हे) Dated व GRN (Government Receipt Number) व त्यानंतर Amount एवढाच मजकूर संदेशात असावा व तो इंग्रजीतून असावा.

९. प्रत्यक्ष त्या त्या जिल्ह्यातील २ ते ५ सेवानिवृत्त शिक्षकांनी एकमेकांशी संपर्क करून "संदेश संपर्काद्वारे काम करणारी समिती" म्हणून काम करावयाचे

*(सहपत्र तीन : परिच्छेद ३ पहा)*

**Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations (MFUCTO)**

University Club House, B Road, Churchgate, Bombay-400020

३० सप्टेंबरच्या सकाळी भुकंपाच्या तिव्र धक्क्याने प्रामुख्याने मराठवाड्याच्या दोन शहरात व लगतच्या ग्रामिण भागात अभुतपूर्व अशी मनुष्यहानी व वित्तहानी झाली. महाराष्ट्राच्या इतिहासाने यापूर्वी कधीही न पाहिलेल्या अशा या निसर्गाच्या प्रकोपाचा सामना करण्याची पाळी भुकंपग्रस्त बांधवावर आली आहे. अशा या प्रसंगी आपण या कामात जेवढी मदत करू तेवढी कमीच आहे.

२. महाराष्ट्रातील प्रत्येक प्राध्यापकांचे एक दिवसाचे पूर्ण वेतन या कामासाठी मुख्यमंत्री निधीला देण्याचा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने घेतला आहे. अभुतपूर्व अशी ही आपत्ती लक्षात घेता प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या पातळीवर किंवा प्रत्येक विभागाच्या प्रशासन अधिकारी उच्च शिक्षण अनुदान यांच्या स्तरावर ही रक्कम वळती करून तत्परतेने भुकंपग्रस्त निधीला द्यावी असेही ठरविण्यात आले आहे.

३. शनिवार दिनांक २ ऑक्टोबर १९९३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने संघटनेचे सरचिटणीस प्रा.के.के.ठेकेदत्त यांनी मुंबई येथे मा.उच्च शिक्षण सचिव श्री.लखनपाल यांना एक लेखी पत्र देवून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा हा निर्णय कळविला आहे.

४. अशा कामी मदत करतांना रक्कम वळती करून देण्याचा पुरस्कार संघटनेने यापूर्वी कधीही केलेला नाही. निसर्गाच्या प्रकोपाने केलेली प्रचंड प्रमाणावरील मनुष्य हानी व वित्त हानी लक्षात घेता अपवाद म्हणून हा निर्णय घेतलेला आहे. अत्यंत अल्प वेळात भरीव अशी रक्कम या कामासाठी त्वरेने उपलब्ध होवू शकेल व ती व्हावी ही भावना या निर्णयामागे आहे.

५. "एक दिवसाचे पूर्ण वेतन" ही या कामी संघटीतपणे द्यावयाची किमान रक्कम आहे. याशिवाय आपआपल्या स्तरावर द्यावयाच्या स्वेच्छाधिन सहभागाचे यथोचित निर्णय त्या त्या स्तरावर प्राध्यापकांनी घ्यावयाचे आहेत.

**बी.टी.देशमुख**

अमरावती — विधान परिषद सदस्य

**दिनांक : ४.१०.९३** — अध्यक्ष, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ

*(P42NB1993)*

आहे. यामध्ये त्या त्या जिल्ह्याच्या नुटा पदाधिकाऱ्यांनी संदेश संपर्काच्या माध्यमातून या कामी मदत करावयाची आहे. या समितीच्या बैठका वगैरे होणार नाहीत. प्रत्येक सदस्याने 'लॉकडाऊन'च्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे व घरीच राहावयाचे व घरीच राहून संपर्क करावयाचा, अशा फोनवरील संवाद संपर्कातूनच सर्व सेवानिवृत्तांना मार्गदर्शन करावयाचे.

**१०.** आता नुटा ई-बुलेटीनची माहिती. परिस्थिती सामान्य होत नाही तोपर्यंत मुद्रित बुलेटिन प्रकाशित करणे कठीण होईल असे दिसते. तेव्हा बुलेटीन ई-फॉर्म मध्ये सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अत्यंत उपयोगी अशा प्रकारचे संपर्क माध्यम म्हणून या बुलेटीनचा वापर करता येईल अशी मला खात्री वाटते. संघर्षाच्या काळामध्ये ई-बुलेटीन मार्फत दैनंदिन माहितीचे परिच्छेद प्रसृत केल्या जातील. मुद्रित बुलेटिन आपल्याला येईल ही अपेक्षा बाजूला ठेवून ई-बुलेटीनच्या माध्यमातून संपर्कात रहावे अशी विनंती करण्यात येत आहे. नुटाचे संकेतस्थळ यापूर्वी आपणाकडे पाठविलेल्या प्रत्येक बुलेटीनच्या शेवटच्या पानावर नमूद आहे. नुटाचे बुलेटीन उपलब्ध करून देणारी लिंक मी नुटाचे कार्यकारी मंडळाचे सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य या सर्व सदस्यांकडे पाठवित/पाठविले आहे. ती लिंक जितक्या जास्त लोकांना फॉरवर्ड करता येईल तितक्या जास्त लोकांना फॉरवर्ड करावी व हे संकटकालीन संपर्काचे माध्यम मजबूत करावे अशी विनंती करण्यात येत आहे. (ई-बुलेटीन इंटरनेटवर किंवा मोबाईलवरसुद्धा वाचता येते.)

**११.** १९८८ च्या संघर्ष काळामध्ये काही दिवस महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे मुखपत्र म्हणून नुटा बुलेटीन प्रकाशित करण्यात येत होते, ही गोष्ट मी मुद्दाम नमूद करीत आहे. चौथ्या वेतन आयोगाचा संघर्ष हा खुपच हातघाईवर झालेला होता. विधानमंडळाचे अधिवेशन नागपूर येथे होते व अधिवेशन काळात दर दिवसाला एक बुलेटिन प्रकाशित करण्यात येत होते. ते कधी दोन पानाचे तर कधी चार पानाचे राहत होते. अशा प्रकारचे ९ विशेष नुटा बुलेटिन १२ डिसेंबर ते २३ डिसेंबर १९८८ या काळात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे मुखपत्र म्हणून या कालखंडामध्ये प्रकाशित करण्यात आले होते.

**१२.** शेवटी एकच नमूद करावयाचे ते असे की, "लॉकडाऊन'च्या सूचनांचे काटेकोर पालन करा, घरात राहा, घरातच राहून संपर्कात राहा आणि या घोर संकटाच्या प्रसंगी खारीचा वाटा उचलण्याचे समाधान मिळविण्यात आनंदाने सहभागी व्हा.

*(Uploaded on www.nuta.in on 31.03.2020)*

***** ***** *****

***(सहपत्र चार : परिच्छेद ३ पहा)***

**FROM THE EDITOR'S DESK**

Dear Teacher Friends,

A pall of gloom has descended on Maharashtra, as a severe earthquake raged nearly fifty villages to dust in the districts of Latur and Osmanabad. A catastrophe of unheard-of magnitude and a devastation of unmeasurable destruction, the earthquake had shattered towns into ruins, turned vacant plains into cremation grounds and made living beings into a mass of flesh and rubble. It is one of the darkest tragedies resulting out of the nature's cruellest jokes. Under such circumstances, mankind stands meek and helpless blinking at the fearful might of nature and God. To wipe the tears of the survivors, to provide them with immediate relief and to enable their rehabilitation, the people and the Government of Maharashtra, of other states in the country, of the other nations in the world and innumerable voluntary organisations are extending a helping hand.

This is an extraordinary and unprecedented situation and every one is eager to participate in the process of alleviation of the victims. In this mighty and gigantic human endeavour, we the teachers also crave to contribute our own mite.

Through this special bulletin we mourn the loss of life of the staggering number. We sincerely pray for peace to the departed souls and also pray to the Almighty to endow the survivors with necessary strength to face the present calamity with fortitude.

**7th October, 1993** **R.Chittaranjan**

Acting, Editor, NUTA Bulletin

(P44NB1993)

## डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा'

### दिनांक : २ एप्रिल २०२०

**१३.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी दिनांक २८ मार्च २०२० रोजी "For Contribution to Combat COVID-19" या विषयावर काढलेले परिपत्रक सोबत प्रसृत केलेले आहे.

**१४.** "माहे मार्च, २०२० च्या वेतन प्रदानाबाबत" महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक ३१ मार्च २०२० रोजी प्रसृत केलेले शासन परिपत्रक (क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५) आपल्या माहितीसाठी जसेच्या तसे प्रसृत करीत आहे.

**१५.** उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिनांक ३१ मार्च २०२० रोजी "अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन." या विषयावर राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंना व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविलेले दिनांक ३१ मार्च २०२० रोजीचे परिपत्रक (क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/४०८५) प्रसृत केले आहे. ते जसेच्या तसे प्रसृत करीत आहे.

*(Uploaded on www.nuta.in on 02.04.2020)*

***** ***** *****

## डॉ. प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष 'नुटा'

### दिनांक : २४ एप्रिल २०२०

**१६.** नजिकच्या काळात सेवानिवृत्त होत असलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांची सभा एप्रिल २०२० च्या पहिल्या आठवड्यात बोलाविण्यात आलेली होती. या सभेची सूचना सन २०२० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १९ वर प्रसृत करण्यात आली होती. "COVID-19" विषाणूच्या प्रादुर्भावामुळे व "लॉकडाऊन"मुळे ही सभा तहकूब करण्यात आल्याचे मी यापूर्वी दिनांक २९ मार्च २०२० रोजी मोबाईल मेसेजद्वारे पुढीलप्रमाणे कळविले होते :-

**"NOTICE :** We, hereby notify that the meeting of SET/NET affected teachers whose superannuation was in near future was scheduled to be held on Sunday 5th April, 2020 at Shikshak Bhavan, Amaravati. But taking into consideration the outbreak of COVID-19 and the lockdown initiated by the Honorable Prime Minister's office, the meeting stands postponed. The date of the next meeting shall be conveyed in due course of time. **- Dr. P B**

***(सहपत्र पाच : परिच्छेद ७ पहा)***

Dated : 29/03/2020 : GRN : 030414201920E

सत्यमेव जयते

MAHARASHTRA
CHIEF MINISTER'S RELIEF FUND
CMRF-COVID 19

RECEIVED with thanks from Mr. BHAURAO DESHMUKH , 3, No.3 SUBODH COLONY,VIDARBHA MAHAVIDYALA ROAD, Amravati (M Corp.), Amravati, District - Amravati, Maharashtra, PIN - 444604

The sum of Rupees ~~Fifteen Thousand (Rs.15000.00 )~~ only by Online Payment. Government Receipt Number - 030414201920E Transaction Id - 200894209113 Dated - 29/03/2020. Collected by STATE BANK OF INDIA,MAIN BRANCH (FORT, MUMBAI)

For General Secretary,
Chief Minister's Relief Fund
Mantralaya, Mumbai - 400 032.

Eligible for 100% exemption from Income Tax u/s 80(G)(2)(iii hf) of Income Tax Act, 1961. Exempted from Stamp Duty under proviso to section 3 of the Bombay Stamp Act, 1958. CMRF PAN: AAATC0294J TAN: MUMC16959F

**Raghuwanshi** President, NUTA."

**१७.** नुटाच्या कार्यकारी मंडळाची बैठक दिनांक १२ एप्रिल २०२० रोजी बोलाविण्यात आलेली होती. या सभेची सूचना २०२० च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ १ वर प्रसृत करण्यात आली होती. "COVID-19" विषाणूच्या प्रादुर्भावामुळे व "लॉकडाऊन"च्या स्थितीमुळे ही बैठक तहकूब करण्यात आल्याचे कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांना मी दिनांक २९ मार्च २०२० रोजी मोबाईल मेसेजद्वारे पुढीलप्रमाणे कळविले होते :-

**"NOTICE :** We, hereby inform all the members of the NUTA Executive that the meeting scheduled on Sunday 12th April, 2020 at Shikshak Bhawan, Amaravati stands postponed taking into consideration the outbreak of COVID-19 and the lockdown initiated by the Prime Minister's office. The next date of the meeting shall be informed in due course of time. **- Dr. P B Raghuwanshi,** President, NUTA"

**१८.** नुटाच्या आमसभेची बैठक दिनांक १७ मे २०२० रोजी बोलाविण्याचे नियोजन करण्यात आले होते व त्याबाबतची पहिली नोटीस दिनांक १५ मार्च २०२० रोजी सन २०२० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १३ वर प्रसृत करण्यात आली होती. "COVID-19" विषाणूचा प्रादुर्भाव व "लॉकडाऊन"ची स्थिती लक्षात घेता ही बैठक तहकूब करण्यात आलेली आहे, असे मी नमूद करीत आहे. त्याबाबतची सूचना स्वतंत्रपणे सोबत प्रसृत केलेली आहे.

**१९.** "माहे एप्रिल, २०२० चे वेतन वेळेत प्रदान करणेबाबत" या विषयावरील महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २२ एप्रिल २०२० रोजीचा शासननिर्णय निर्गमित केला असून त्यामध्ये "माहे एप्रिल, २०२० चे वेतन नियमित पद्धतीने एकाच टप्प्यात प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे" असे नमूद आहे. या शासननिर्णयात पुढे असेही म्हटले आहे की, "सर्व अनुदानीत संस्था, विद्यापिठे, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांनीदेखील माहे एप्रिल, २०२० चे वेतन त्यांचे प्रचलित पद्धतीने अदा करण्यास शासनाची हरकत नाही." सदरहू शासननिर्णयाची प्रत सोबत प्रसृत केलेली आहे.

**२०.** कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित केल्या असे म्हणायचे पण त्यांनी केलेली सेवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी मात्र धरायची नाही. अनेक कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये या विरुद्ध दाद मागितली व निर्णय त्यांच्या बाजूने लागले. शासनाने या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या विषयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ९९६२ मध्ये कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला. हा निर्णय सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १५० वर शब्दशः प्रसृत करण्यात आलेला आहे.

**२१.** दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ९९६२ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जो उपरोक्त निर्णय दिला त्याच्या विरोधात शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. ती विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ सप्टेंबर २०१२ रोजी पुढील शब्दात फेटाळून लावली :-

"In the facts and circumstances of these cases, we are not inclined to interfere with the impugned orders. The special leave

*परिच्छेद १३ पहा*

## UNIVERSITY GRANTS COMMISSION

**CHAIRMAN : PROF. D. P. SINGH**

(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph.011-23234019, 23236350 Fax : 0l l-2323 9659 E-mail :cm.ugc@nic.in web:www.ugc.ac.in

**28th March, 2020**

**APPEAL : For Contribution to Combat COVID-19**

Dear Colleagues,

Our country and the world as a whole are passing through unprecedented times due to COVID-19 pandernic. The number of persons infected with Corona virus are increasing day by day. We, the educational fraternity, have a great responsibility of not only making the people aware of preventive and precautionary measures to safeguard themselves and check the further spread of this virus, but also come forward to contribute financially to strengthen the efforts of the Government to combat the COVID-19 pandemic.

**We, at UGC, have decided to make a humble contribution of One Day Salary to the Prime Minister's National Relief Fund.** I appeal to the Vice Chancellors of the Universities and Directors/ Principals of Institutes/Colleges to urge the teaching and non-teaching colleagues of their institutions to come forward and contribute for this noble cause. I am sure that this humble contribution of the educational fraternity will go a long way in serving the humanity in present moments of crisis.

Let us stand together for the well-being of our countrymen and the mankind as a whole during this challenging time.

Best wishes.

Prof. D. P. Singh
Chairman

** AF : P 027 **

*परिच्छेद १४ पहा*

*माहे मार्च, २०२० च्या वेतन प्रदानाबाबत...*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**तारीख : ३१ मार्च, २०२०**

### शासन परिपत्रक

कोव्हीड-१९ मुळे निर्माण झालेल्या आरोग्य व आर्थिक आपत्तीवर मात करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत. सर्व खाजगी आस्थापना व उद्योग बंद असून त्यातून प्राप्त होणाऱ्या महसूलात लक्षणीय घट झाली आहे. सर्व शासकीय कार्यालये ५% कर्मचारी क्षमतेने कार्यरत आहेत. आर्थिक वर्षाअखेर राज्याची एकंदर आर्थिक परिस्थिती विचारात घेता, खर्चात काटकसर करणे तसेच काही खर्च पुढे ढकलणे गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सर्व निवडून आलेले लोकप्रतिनिधी तसेच शासकीय/निमशासकीय/विद्यापिठांसह सर्व अनुदानित संस्थामधील सर्व अधिकारी व कर्मचारी (अखिल भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांसह) यांचे माहे मार्च, २०२० चे माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान करण्यात येणारे वेतन दोन टप्प्यात अदा करण्यात यावे.

| गट/तपशिल | सध्या अदा करावयाच्या वेतनाची टक्केवारी |
|---|---|
| मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, मा.सभापती व उप सभापती (विधानपरिषद), मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष (विधानसभा), मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, सर्व महामंडळाचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी व व निवडून आलेले प्रतिनिधी | ४०% |
| गट अ | ५०% |
| गट ब | ५०% |
| गट क | ७५% |
| गट ड | १००% |

उर्वरित वेतनाची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. राज्यातील सर्व अस्थायी पदांची मुदत प्रतिवर्षी माहे फेब्रुवारी अखेर संपुष्टात येते. अशा पदांचे वेतन आहरित करण्यापूर्वी दि. १ मार्च पासून अशा पदांना मुदतवाढ देण्याचे आदेश संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निर्गमित करण्यात येतात. सदर आदेशाद्वारे सर्व विभागांच्या अस्थायी पदांना दि. ३१ मे, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरचे आदेश सर्व सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील लागू राहतील. सदर आदेशाच्या अनुषंगाने तपशीलवार सूचना वित्त विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२००३३११४३२५३१५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(अजोय मेहता)**
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

** AF : P 021 **

petitions are dismissed." **मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश सोबत प्रसृत केलेला आहे.**

**२२.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील मंत्रालयातील तसेच बृहन्मुंबईतील राज्य शासकीय कार्यालयात लिपिकवर्गीय संवर्ग तसेच अन्य संवर्गात महाराष्ट्र लोकसेवा आयोग **अपुरस्कृत** उमेदवार म्हणून नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा हंगामी सेवा असल्या तरी पदोन्नतीच्या प्रयोजनार्थ त्या सेवा सुद्धा धरण्यात याव्या. कालबद्ध पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना किंवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी तात्पुरती सेवासुद्धा धरण्यात यावी अशा अर्थाचा एक निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ९०५१ मध्ये दिला. हा संपूर्ण निर्णय शब्दशः सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १२१ ते १३५ वर प्रसृत करण्यात आलेला आहे. या निर्णयाच्या परिच्छेद ३० मध्ये याच उच्च न्यायालयाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ९९६२ मध्ये दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ रोजी कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिल्याचा उल्लेख असून **त्याच परिच्छेदात राज्यशासनाची SLP मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ सप्टेंबर २०१२ रोजी फेटाळून लावल्याचे नमूद केले आहे.**

**२३.** मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयातील कायदेशीर मुद्यांची

*परिच्छेद १५ पहा*

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)*

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

Web : www.dhepune.gov.in E-mail : prash.dhepune@gov.in

फोन नं. ०२०-२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

फॅक्स नं. ०२०-२६११११५३

क्र.उशिंस/कोरोना/मवि-१/२०२०/४०८५

**दिनांक : ३१ मार्च २०२०**

प्रति,

१. मा. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे

२. प्राचार्य/संचालक सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये

**विषय :** अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे **एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन.**

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि. २८ मार्च, २०२० चे पत्रान्वये व काही शिक्षक/शिक्षकेतर संघटनांनी कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा मुकाबला करण्यासाठी एक दिवसाचे वेतन कपात करणोबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपला देश आणि एकूणच जग कोविड-१९ च्या आजारामुळे अभुतपूर्व संकटास सामोरे जात आहे. कोरोना विषाणूची लागण झालेल्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपल्या सर्व शैक्षणिक संस्थाची जबाबदारी आहे की, स्वतःला संरक्षण देण्यासाठी आणि या विषाणूचा पुढील प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि सावधगिरीच्या उपाययोजनांबद्दल लोकांना जागृत करणे इतकेच नव्हे तर शासनास या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठीच्या प्रयत्नांना बळकटी देणे ही देखील मोठी जबाबदारी आहे.

सर्व अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आवाहन करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू केल्याने संकट निर्माण झाले आहे. संपूर्ण राज्यातील संचारबंदीमुळे रोग निवारण कामी सर्व कर्मचारी यांना सक्रिय होता येत नाही. अशा परिस्थितीत या संकटाला सामोरे जाण्यासाठी वरील **सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांच्या कुलगुरू/प्राचार्य/संचालक यांना आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आपले एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड-१९" मध्ये जमा करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.** उपरोक्त आव्हानात्मक काळात आपल्या देशवासियांच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी एकत्र उभे राहुया तसेच या महासंकटाचा मुकाबला धैर्याने व एकजुटीने करणेकामी आपले मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

प्रत माहितीस्तव : सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मजबुती लक्षात घेता या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात अपीलात जायचे नाही असा निर्णय राज्यशासनाने घेतला व उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाची तंतोतंत अंमलबजावणी करणारा शासननिर्णय निर्गमित केला. "कालबद्ध पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी **तात्पुरती सेवा देखील विचारात घेणेबाबत**" या मथळ्याचा महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयामध्ये उपरोक्त उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबतचा उल्लेख पुढील शब्दात नमूद आहेः-

"हे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका क्र. १४०७०/२०१२; CC १७९२७-१७९३०/२०१२ (याचिका क्र. ९९६२/२०१० मधील ६.२.२०१२ च्या आदेशाविरुद्ध) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिनांक २८.९.२०१२ रोजीचे आदेश तसेच याचिका क्र. ९०५१/२०१३ व इतर संलग्न याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २८.४.२०१६ रोजी दिलेले आदेश, **तसेच विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५३४-२०१६/ई, दिनांक ४.७.२०१६ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.**"

हा शासननिर्णय सन २०१६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १७९ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

**२४.** दिनांक १७ एप्रिल २०२० रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण सेवकाच्या धर्तीवर नेमण्यात आलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या नेमणूका नियमित करण्याच्या संदर्भात एक अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. हिमाचल प्रदेशाच्या अनेक भागात पुरेसे प्राथमिक शिक्षक उपलब्ध होत नाहीत, म्हणून २००१ व २००३ मध्ये वेगळ्या पद्धतीने शिक्षक भरतीच्या काही योजना हिमाचल प्रदेश सरकारने तयार केल्या व त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षकांची भरती केली. या तीन योजना पुढीलप्रमाणे नमूद करता येतील :-

(i) The Himachal Pradesh Prathmik Sahayak Adhyapak/ Primary Assistant Teacher (PAT) Scheme

(ii) The Himachal Pradesh Para Teachers (Lecturer School Cadre), Para Teachers (TGT's) and Para Teachers (C&V) Policy, 2003

(iii) The Himachal Pradesh Gram Vidya Upasak Yojna, 2001

**२५.** या तीन योजनेतंर्गत हिमाचल प्रदेश शासनाने अनेक शिक्षकांच्या नेमणुका केल्या. ही गोष्ट खरी आहे की, ह्या नेमणुका ज्यावेळेला करण्यात आल्या त्यावेळेला त्यांना सेवेत नियमित करण्याची मागणी करता येणार नाही अशा प्रकारची अट त्या योजनांमध्ये होती. पण पुढे ज्यावेळेला या सर्व शिक्षकांनी यथोचित पात्रता प्राप्त केल्या त्यावेळेला त्यांच्या सेवा नियमित करण्यात आल्या.

**२६.** सन २०१२ मध्ये या शिक्षकांच्या नेमणूका रद्दबातल ठरविण्यात याव्यात अशा प्रकारची याचिका हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली. त्या न्यायालयाच्या एकल पीठाने (Single Judge) दिनांक

*परिच्छेद १८ पहा*

## Nagpur University Teachers' Association

**POSTPONEMENT OF THE MEETING**

**NOTICE**

**DATED : 24.04.2020**

**From :**

**Dr.Vilas Dhone**
Secretary, NUTA 14, Samruddhi Nagar,
Sewagram Road, Wardha-442 001

**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I am requested by the President to inform you that the meeting of the NUTA GB scheduled to be held on 17th May 2020 **is hereby postponed,** taking into consideration the "Lockdown" situation in the Nation. The date of the meeting shall be conveyed in due course of time.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Vilas Dhone,**
Secretary, NUTA.

१८ ऑक्टोबर २०१२ रोजी निर्णय दिला तो त्या प्राथमिक शिक्षकांच्या विरोधात. एकल खंडपीठाने दिलेल्या निर्णयात मुख्य मुद्दा असा होता की, या शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या त्यावेळेला त्या पदासाठीची किमान पात्रता ते धारण करीत नव्हते. त्यामुळे या शिक्षकांच्या सेवा नियमित करू नये असे आदेश एकल पीठाने दिले. ("The learned Single Judge has further directed the State not to regularise the teachers." - Para 4)

**२७.** एकल पीठाच्या निर्णयाच्या विरोधात याच उच्च न्यायालयाच्या द्वीसदस्यीय खंडपीठासमोर (Division Bench) या प्राथमिक शिक्षकांनी अपीले दाखल केली. या द्वीसदस्यीय खंडपीठाने या शिक्षकांचे म्हणणे मान्य केले व त्या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिला. एकल पीठाचा निर्णय रद्दबातल ठरविण्यात आला. **द्वीसदस्यीय खंडपीठाने या शिक्षकांच्या बाजूने निर्णय देत असतांना आपल्या निकालामध्ये मुख्यत्वे पाच कारणे नमूद केली असे दिसून येते. ती पाच कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-**

(i) ह्या सर्व नेमणुका २००१ व २००३ या वर्षामध्ये करण्यात आलेल्या आहेत आणि त्या रद्द ठरविण्याविषयीची याचिका मात्र सन २०१२ मध्ये दाखल करण्यात आलेली आहे. ज्या याचिकाकर्त्यांनी याचिका दाखल केली ते स्वतः सुद्धा हे पद धारण करण्याची पात्रता त्यावेळेला धारण करीत नव्हते.

(ii) ह्या नेमणुका झाल्या त्यावेळेला ह्या शिक्षकांची निवड करण्याला व नेमणुका करण्याला **त्यावेळेला कोणीही हरकत घेतली नाही.** ११ वर्षानंतर अशी हरकत घेणारी याचिका दाखल करण्यात आली. राज्यशासनाने धोरण ठरवितांना योग्य त्या पात्रतेचे शिक्षक उपलब्ध होत नाहीत हे लक्षात घेऊन ह्या नेमणुका त्यावेळेला केलेल्या असल्यामुळे त्या नेमणुका बेकायदेशीर आहेत असे इतक्या उशीराने कोणालाही म्हणता येणार नाही.

(iii) इतकी प्रदिर्घ सेवा त्या शिक्षकांनी केलेली असल्यामुळे त्यांच्या सेवा नियमित करण्याची कृती ही योग्यच म्हटली पाहिजे.

*परिच्छेद १९ पहा*

*माहे एप्रिल, २०२० चे वेतन वेळेत प्रदान करणेबाबत*

## *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.६२/कोषा-प्रशा-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**दिनांक : २२ एप्रिल २०२०**

**संदर्भ** : (१) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.६२/कोषा-प्रशा-५, दि. ३१.०३.२०२० (२) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.६२/कोषा-प्रशा-५, दि. ०१.०४.२०२०

**शासन परिपत्रक**

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील परिपत्रकान्वये माहे मार्च, २०२० चे वेतन दोन टप्प्यात अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्याचे वेतन आहरित करण्याबाबतच्या सूचना उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. माहे मार्च, २०२० चे उर्वरित वेतन दुसऱ्या टप्प्यात आहरित करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

आता **माहे एप्रिल, २०२० चे वेतन नियमित पद्धतीने एकाच टप्प्यात प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.** त्यास अनुसरून सर्व विभागांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी त्यांची वेतन देयके नेमून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे वेळीच कोषागारात सादर होतील हे पहावे, जेणेकरून कोषागारांनादेखील मर्यादित मनुष्यबळाच्या आधारे त्यावर वेळीच कार्यवाही करणे शक्य होईल.

**सर्व अनुदानीत संस्था, विद्यापिठे, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांनीदेखील माहे एप्रिल, २०२० चे वेतन त्यांचे प्रचलित पद्धतीने अदा करण्यास शासनाची हरकत नाही.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२००४२२१६५१०५७४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(इंद्रजित गोरे)**
शासनाचे उपसचिव

** AF : P 029 **

(iv) मोठ्या प्रमाणावर शिक्षकांच्या जागा वर्षानुवर्षे रिक्त राहत होत्या आणि त्यामुळे त्या जागा भरण्यासाठी राज्यशासनाने या योजना तयार करून या शिक्षकांची भरती केली, हा मुद्दा राज्यशासनाने पुरेशा समाधानकारकपणे आमच्यासमोर मांडलेला आहे.

(v) अजूनही अशा शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. अशा स्थितीत Public Interest Litigation म्हणून याचिका दाखल करणे हे समर्थनीय म्हणता येणार नाही. शिवाय या याचिकेमध्ये नेमणुका झालेल्या शिक्षकांना प्रतिवादी सुद्धा करण्यात आलेले नाही.

**२८.** हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाच्या द्वीसदस्यीय खंडपीठाने दिलेल्या या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करण्यात आले. हे अपील आता दिनांक १७ एप्रिल २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये असे नमूद केले आहे की, २००१ आणि २००३ मध्ये ह्या नेमणुका विशेष योजनेच्या अंतर्गत करण्यात आल्या. **त्यावेळेला कोणीही नेमणुकीला व योजनेला हरकत घेतली नाही.** ("At the relevant point of time nobody has questioned either the schemes or the appointments. " - Para 11)

**२९.** सर्व शिक्षकांना सुरुवातीला फक्त दोन हजार रुपये वेतन नेमणुकीच्या वेळेला दिल्या जात होते. पुढे जुलै २०१३ मध्ये ८९०० करण्यात आले. ("It is submitted that such appointments were made on the monthly remuneration of Rs.2000/- and the honorarium was increased

*परिच्छेद २१ व २२ पहा*

ITEM NOS.7 & 55 COURT NO.12 SECTION IX

## SUPREME COURT OF INDIA

Record of Proceedings

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil)....../2012 CC 14070/2012 (From the judgement and order dated 06/02/2012 in WP No.9962/2010 of the HIGH COURT OF BOMBAY) DIR.OF TECHNICAL EDUCATION Petitioner(s)

**VERSUS**

NANDA C CHAVAN & ORS. Respondent(s) (With I.A. No.1 for c/delay in filing SLP and c/ delay in refiling SLP) WITH SLP(C) No......CC 17927-17930/2012 (With application for c/delay in filing SLP and office report)

**Date : 28/09/2012**

These Petitions were called on for hearing today.

**CORAM**
**HON'BLE MR. JUSTICE SURINDER SINGH NIJJAR**
**HON'BLE MR. JUSTICE H.L. GOKHALE**

**For Petitioner(s)** Mr. Manish Pitale,Adv.* Mr. Sanjay Kharde,Adv.* For Ms. Asha Gopalan Nair,Adv.* **For Respondent(s)** Mr. Vinay Navare,Adv.* Mr. Keshav Ranjan,Adv.* Mr. Satyajeet Kumar,Adv.* For Ms. Abha R. Sharma,Adv.* Mr. M.Y. Deshmukh,Adv.* Mr. Yatin M. Jagtap,Adv.* Mr. Shrikant R. Deshmukh,Adv.*

UPON hearing counsel the Court made the following

## ORDER

Delay condoned.

In the facts and circumstances of these cases, we are not inclined to interfere with the impugned orders. The special leave petitions are dismissed.

However, the questions of law raised in the special leave petitions are kept open.

(A.S. BISHT) COURT MASTER

(INDU BALA KAPUR) COURT MASTER

in July 2013 to Rs.8900/-." - Para 9)

३०. या शिक्षकांची सेवा १५ वर्षांपेक्षा जास्त झालेली आहे तेव्हा त्यांच्या सेवा नियमित करण्याला आक्षेप घेता येणार नाही. असा स्पष्ट निष्कर्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नोंदलेला आहे. ("In that view of the matter, we are of the view that when the appointees appointed under the scheme have completed more than almost 15 years of service now and also have acquired the professional qualifications, they cannot be denied regularisation at this point of time." - Para 11)

